# साहित्य वंचितांचे

-संपादक-

डॉ. मयुर बंडू लहाने



Scanned with CamScanner

# साहित्य वंचितांचे

- संपादक -

**डॉ. मयुर बंडू लहाने**

बी. ए. (हिंदी), एम.ए. (इंग्रजी), एम.ए. (मराठी)

डि.एड., बी.एड., एम.एड.,

एल. एल. बी., पीएच. डी.

प्रकाशक

आकांक्षा पब्लिकेशन

हिवरखेड (रूप.) ता. तेल्हारा जि. अकोला

९०९६५९३८४२

Scanned with CamScanner

- साहित्य वंचितांचे
  संपादक : डॉ. मयुर बंडू लहाने

- SAHITYA VANCHITANCHE
  Editor : Dr. Mayur Bandu Lahane

- ISBN : 978-81-952462-3-6



- © डॉ. मयुर बंडू लहाने
  राम मंदिर जवळ पेठ पुरा हिवरखेड (रूप.)
  ता. तेल्हारा जि. अकोला ४४४१०३.



- **प्रथमावृत्ती**
  १४ नोव्हेंबर २०२२

- **मुखपृष्ठ**
  डॉ. मयुर बंडू लहाने

- **अक्षरजुळवणी**
  डॉ. मयुर बंडू लहाने
  आकांक्षा पब्लिकेशन
  ९०९६५९३८४२

- **प्रकाशक व मुद्रक**
  डॉ. मयुर बंडू लहाने
  आकांक्षा पब्लिकेशन
  हिवरखेड (रूप.) ता. तेल्हारा जि. अकोला
  ९०९६५९३८४२
- Email ID : akankshajournal@gmail.com
  lahane_mayur@rediffmail.com

- **मुल्य : १५० /-**



या पुस्तकातील मजकुराशी प्रकाशक किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील मजकुर हे लेखकाचे स्वतंत्र विचार आहेत. तसेच कोणताही मजकुर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखकाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.


Scanned with CamScanner

# अ नु क्र म णि का


१. वंचित समाजाची वेदना आणि संत साहित्य
– प्रा. डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे १ ते १२

२. साहित्यातील स्थित्यंतरे व वंचित
– प्रा. डॉ. अपर्णा अ.पाटील १३ ते १८

३. 'खाली जमीन वर आकाश' डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे आत्मकथन, अंधारातून प्रकाशाकडे एक सकारात्मक प्रगतिशील प्रवास
– डॉ. शारदा विजय निवाते १९ ते २९

४. वंचित साहित्या पुढील आव्हाने : एक अभ्यास
– डॉ. देवानंद सखाराम अंभोरे ३० ते ४०

५. भटके विमुक्तांचे साहित्य
– प्रा. डॉ. रिता वाळके (डंभाळे) ४१ ते ४६

६. बाबुराव बागुल यांच्या कथांमधील वंचित स्त्रियांचे जीवन दर्शन
– प्रा. गीता भाऊराव गावंडे ४७ ते ५६

७. संत कवयित्रींच्या रचनांचा विवेचक अभ्यास
– डॉ. सुचिता पाटेकर ५७ ते ८०

८. समर्थ रामदास स्वामीचे "दासबोध"
– प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी ८१ ते ९०

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक बहुआयामी व्यक्तीमत्व
– श्री. संतोष कान्हूजी पट्टेबहादूर ९१ ते ९८

१०. मराठीतील आद्य कवयित्री महदंबा आणि तिचे 'धवळे'
– डॉ. अनुजा चव्हाण ९९ ते १०७


Scanned with CamScanner

ISBN : 978-81-952462-3-6



# ८. समर्थ रामदास स्वामीचे "दासबोध"

**प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी**

सहयोगी प्राध्यापक, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य, विज्ञान
महाविद्यालय अंजनगाव सुर्जी

**समर्थ रामदास स्वामी**

**जन्मनाम** : नारायण सूर्याजीपंत ठोसर

**आईचे नाव** : राणूबाई

**गाव** : जांब (बीड) घराणे.

लहानपणापासूनच हनुमंत व रामोपासक. 'सावधान' नारायणाचे रामदर्शनासाठी पलायन व नाशिक येथे गोदावरीच्या काठी बारा वर्षे पुरश्चरण, श्रीरामदर्शनाची अनुभूती व त्यानंतरची बारा वर्षे भारतभ्रमण. देशकाल परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण, कृष्णातीरी वास्तव्य आणि 'समर्थ' संप्रदायाच्या उभारणीला सुरुवात.

'राघवाची पदे मानसी धरीन ।
विश्व उद्धरीन हेळामात्रे ।।'

असा रास्त अन् प्रखर आत्मविश्वास. प्रत्येक चळवळीस भगवंताचे अधिष्ठान असल्यामुळे आधी 'देव मस्तकी धरावा' आणि मग 'अवधा हलकल्लोळ करावा' हे रामदासी ब्रीद, अकरा मारुतींची स्थापना म्हणजे जणू राष्ट्रीय चळवळीची अकरा केंद्रे. श्रीरामनवमी उत्सवाची सुरुवात करून लोकसंघटन. 'दास डोंगरी राहतो' व देवाची यात्रा पाहत समुदाय जोडत त्यांना 'एकविचारे' भरीत 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।' इथपर्यंत 'समर्थ' करितो. आनंदवनभुवनाचा साक्षात्कार देणारे रामदास. शिवाजी



Scanned with CamScanner

महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे अधिष्ठान व सकृतरूप असणारे सद्गुरू रामदास.

भारतभ्रमण केल्यानंतरही अखंड 'नित्यनूतन हिंडावे' हे समर्थांचे ब्रीदवाक्य असल्याने ते एका जागी असे फार दिवस कधीच राहिले नाहीत. शिवथरघळ, सज्जनगड ही तर त्यांची ग्रंथरचनास्थाने पण शिवाजीराजांच्या राजकारणात 'सावध राहणारे आणि त्यांना 'स्वराज्याचा मंत्र' देणारे समर्थ, सांप्रदायिक शिष्य सर्वार्थाने महाराष्ट्रभर जागृत होते हेच खरे ! जसा कवी त्यास एकरूप असे त्याचे काव्य - म्हणूनच 'रामभक्ती' ही राष्ट्रीय चळवळ असली तरी त्यासाठीच समर्थांची ओजस्वी वाणी अवघ्या देशकालपरिस्थितीला व्यापून उरली.

**रामदासी काव्य :**

(मारुती स्तोत्र, आरत्या, सवाया)

दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, लघुरामायण, चौदा ओवीशते, स्फुट किंवा प्रासंगिक काव्ये, अभंग, रामवरदायिनी, आनंदवनभुवन (प्रकरणे), लघुकाव्ये.

**दासबोध :** समर्थहृदय, अध्यात्म, तत्त्वज्ञान, व्यवहार, कला, वैद्यक, विश्वविज्ञान.

**मनाचे श्लोक :** भिक्षा मागताना आपण लाचार, दीन असू नये. आपणही काही सद्विचार व रामभक्ती द्यावी, ती वाढवावी हा हेतू. भक्ती, संस्कार, जगद्व्यवहाराचा मेळ.

**करुणाष्टके :** रामदासांच्या साधकावस्थेतील आत्यंतिक तळमळ, रामदर्शनावाचून दुसरे गंतव्य नाही. भावकाव्याचा आदर्श, करुणभावरस, उत्कट, एकात्मरचना.





**लघुकाव्ये :** चाफळ मठ-दिवाकरांकडे मठाधिकार. शिष्या वेणाबाईशी बोलताना लोणची, कोशिंबीर, पालेभाज्या, फळभाज्या इ. तपशील समर्थ देत असत. जसा प्रसंग तसाच प्रत्यय ! त्यामुळे समर्थांच्या पंगतीचा आनंद आपल्यालाही घेता येईल.

वाढिली नाना परमान्ने । सुवासे शोभती वरान्ने ।
दूध, दही, साय, द्रोणे । भरून ठेविले ।।
मग तो संकल्प सोहिला । तेणे मोठा आनंद जाला ।
नामस्मरणे घोष केला । भोजन आरंभिले ॥
आपोशने केली समस्ती । मग घेतल्या प्राणाहुती ।
नेत्रस्पर्शने सोडिती । शिखा वामहस्ते ।।
भक्षे मोडिता गुद्गुल्या होती ।
तुपामध्ये बुचकाळिती ।
वरपवरपों जेविती । कितीयेक ॥
शिखरणी वरपती सरारां । कढी वरपती फरारां ।
ढेकर देती उरारां । सावकास ।।
येक ते गुचक्या देती । उदके मागुती सेविती ।
हात टेकून जेविती । कितीयेक ॥

लघुरामायण : रावणाच्या बंदिवासातील देवांच्या हालअपेष्टांचे वर्णन :
(मुलांना उदाहरण देता आले तर उपयुक्त ठरेल - रामदासी शब्दांचा प्रत्यय)

समीर लोटितो खडे । वरूण घालितो सडे ।
मयंक साउली धरी मळीण पावकु हरी ॥
अखंड चाकरी करी । सदा वरूचि भादरी ।
सटी आंधळी दळी । गणेश गाढवे वळी ।



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-952462-3-6

परोपरी विटंबना । वदेल कोण रावणा ।
उदंड देव पीडिले । मंद पदासि खंडिले ॥

समर्थांनी राजनीति, समाजकारण आणि परमार्थाच्या बळकट पायावर उभा असलेला प्रयत्नवाद या तिन्ही गोष्टींची शिकवण रामकथेच्या रूपाने महाराष्ट्राला दिली. समर्थांच्या रामोपासनेइतकीच काव्योपासनाही अखंड आहे. समुदाय करावे, महंत मेळवावे व रामभक्तीने शक्तियुक्त करावे ही एक वृत्ती व दुसरीकडे 'एकांत 'सेवावा' हे ब्रीद ! त्यांपैकी लोकांतातील रचना ही उपदेशपर आहे. रामवाणीचा प्रत्यय आलेले समर्थ हे एकांतप्रिय होते. 'गजबज मज आतां सर्वथा आवडेना' असे म्हणून ते रानावनांत जात. शिवथर खोऱ्यांतील पावसाळ्यातील वनश्रीचे वर्णन करताना ते म्हणतात:

'पसरले सरले गिरी साजरे ।
सरवटे धुकटे भरितें भरे ।
बहुत बात झडांत झडाडितो ।
वर तरू वरताचि कडाडितो ॥
सरस रम्य रसाळ वनांतरा ।
हरित रंग सुरंग दिसे बरा ।
दिसतसे रमणीय वसुंधरा ।
नूतन पल्लव हा तरू साजिरा ।।'

'डोंगरी' अखंड फिरणाऱ्या, रामभक्तीच्या मस्तीत निर्भयपणे रानावनांतून हिंडणाऱ्या, हनुमंताच्या शक्तीचा आत्मप्रत्यय स्वतःमध्ये प्रकट करण्याची रामयुक्ती साध्य असणाऱ्या समर्थांनी अवघ्या सृष्टीशी एकरूप होऊन आपल्या सौंदर्यदृष्टीचा सुंदर अन् रम्य साक्षात्कार घडविला आहे. मात्र त्यातच न रमता ते 'देवाकारणे' लावून देणे हे समर्थांचे वैशिष्ट्य होय.




ISBN : 978-81-952462-3-6

समर्थांची वाणी नेहमीच खणखणीत, बोल सदाचेच रोकडे, ओजस्वी शब्दयोजना व घणाघाती शब्दशक्तीचा प्रत्यय देणारी आहे. 'नित्यनूतन हिंडावे, सकळांसि सख्य राखावे, लोक भक्तिस लावावे, संग तो श्रेष्ठ शोधावा, वैभव सर्व देवाचे हे ओळखून वर्तावे' या प्रयत्नवादाची शिकवणूक त्यांनी अखंड दिली. समर्थांना अनेकविध विषयवैचित्र्याची असलेली आवड रामभक्तीच्या प्रत्ययात त्यांनी विलीन केलेली दिसते. चाफळखोऱ्यात राहणाऱ्या या तशा कडक मनालाही कलेचा ओलावा होता. 'धन्य ते गायनी कळा' असे उच्चरवाने सांगण्याचा मनाचा मोठेपणा व रसिकताही होती. त्यांनी अनेक पदांना रामाची नावे दिलेली असून काही पदे तर 'रागवर्णनपर' आहेत.

उदा. : 'असावरी'वरील पद

'असावरी राग, असावरी राग, असावरी राग, रंग माजे ।
ताळ मृदांग उपांग यंत्रेवीणे सर्वहि हलकल्लोळ गाजे ।।'

शब्दांची पुनरावृत्ती, आघात, शब्दविस्तार आणि खास रामदासी बाण्याचा ओजस्वी आविष्कार समर्थांच्या बहुतेक सर्वच रचनांमधून दिसतो.

उदा.

१. आभाळभरी देवे । आभाळभरी ।

२. घटका गेली पळे गेली तास वाजे झणाणा ।
आयुष्याचा नाश होतो राम का रे म्हणाना ।।

३. सावधान सावधान । वाचे बोला नारायण ॥

४. लघुरामायण – राम–रावण युद्धप्रसंग
गरूडास ते राम सोडी भडाडां ।
नभी चालिली पक्षकूळे झडाडां ।
तिही तोडिली सर्पकूळे तडाडां ।



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-952462-3-6

कपी गर्जती नामघोषे धडाडां ॥

याच रामदासी काव्याचा सुरेख प्रत्यय म्हणजे 'गिरीचे मस्तक गंगा'.

दासबोधात आरंभीच शब्दसृष्टीच्या ईश्वरांना वंदन करताना समर्थ म्हणतातः

कीं हे शब्दरत्नांचे सागर ।
कीं हे मुक्तांचे मुक्त सरोवर ।।
नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ॥
कीं हा ईश्वराचा पवाड ।
पाहता गगनाहून वाह ।
ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंधरचना ॥

श्रोत्यांना व वाचकांना रसभावासह आत्मप्रत्यय देण्याची हातोटी हे समर्थाचि सामर्थ्य 'गिरीचे मस्तक गंगा' या कवितेत दिसून येते. एकांतवासात आत्मरामी रमणारे रामदास सौंदर्यसुखास पारखे नव्हते हे त्यांनी सृष्टिसान्निध्यात बसून केलेल्या यथार्थ वर्णनावरून लक्षात येते. महाबळेश्वरच्या परिसरातील एका धबधब्याचे भव्योदात्त असे शब्दचित्र रंगविताना समर्थ रामदास म्हणतातः

गिरीचे मस्तकीं गंगा तेथुनी चालिली बळे ।
धबाबा लोटल्या धारा धबाबा तोय आदळे ॥ १ ॥
गर्जतो मेघ तो सिंधु ध्वनिकल्लोळ उठिला ।
कड्यासी आदळे धारा वात आवर्त हातसे ॥२॥
तुशार उठती रेणु दुसरे रज मातलें ।
वातमिश्रित ते रेणु सीतमिश्रित धूकटें ॥ ३ ॥
दराच तुटला मोठा झाडखंडें परोपरीं ।
निबीड दाटली छाया त्यामधें ओघ वाहती ॥ ४ ॥
गर्जती श्वापदें पक्षी नाना स्वरें भयंकरें ।




ISBN : 978-81-952462-3-6

गडद होतसे राजी, ध्वनिकल्लोळ उठती ॥ ५ ॥
कर्दमु निवडेना तो, मानसीं सांकडें पडे ।
विशाल लोटली धारा ती खालें रम्य वीवरें ॥ ६ ॥

साक्षात एखादे निसर्गचित्र पाहावे इतकी विलक्षण अनुभूती समर्थांच्या या शब्दांत आहे. संत ज्ञानेश्वरांसारखा गोडवा या भाषेत नसला तरी निसर्गही रामदासांच्या सहवासात ओजस्वी, परखड आणि भव्योदात्त होतो. त्याचाच हा अनोखा प्रत्यय !

पर्वत शिखरावरून प्रचंड वेगाने गंगेचे (नदीचे) पाणी सर्वस्वासह खोल दरीत आदळते. त्या लोटून देण्याचा आवेग कसा? धबाबा...! पाण्याच्या वेगाचा हा नाद केवळ एकाच अर्थवाही शब्दात व्यक्त झाला आहे. शिवाय त्या शब्दाच्या पुनरुक्तीने लोटून देण्याचा वेग आणि पाण्याचा ओघ किती प्रचंड असेल त्याची कल्पना येते. मेघांच्या गर्जनेप्रमाणे त्या प्रवाहाचा अवघा ध्वनिकल्लोळ उठला आणि दरीतील कडे, खडक यांवर आदळणाऱ्या पाण्यामुळे वाऱ्याचा भोवरा तयार होतो. प्रचंड कड्यांवरून, पाषाणांवरून आदळत खाली कोसळणाऱ्या या धबधब्याचे तुशार म्हणजे जणू धुळीकण आणि पाणी यांचे युद्धच ! त्या प्रपाताचा आवेगच इतका तुफानी आहे की आजूबाजूचे वातावरण धूसर होत चालले आहे.

एखादा पाषाण रोरावत खाली येताना ज्याप्रमाणे वाटेतील सर्वांवर आदळत, तुडवत खाली येतो त्याप्रमाणेच हा जलप्रपात दरीत कोसळताना दरीतील झाडाझुडुपांना तुडवत येत आहे. जंगलात घनदाट अंधार पसरलेला असताना त्या जलप्रपाताची भयंकर गाज अरण्याची भयानकता अधिकच जाणवून देणारी आहे. जंगलातील श्वापदांच्या, पशु-पक्ष्यांच्या भयंकर स्वरांमुळे अवघे वातावरण रुद्रभीषण झाले आहे. जसजशी काळोखी रात्र वाढत

ISBN : 978-81-952462-3-6

चालली आहे तसतसा जंगलातील ध्वनिकल्लोळही भीषण होत चालला आहे. वेगाने धबाबा कोसळणाऱ्या जलप्रपातामुळे दरीत प्रवाहित होताना इतका चिखल झाला की, मनामध्ये त्याच्या प्रचंड प्रवाहाचे संकट (भीती) वाटू लागले. तो विशाल, प्रचंड जलप्रपात कोसळताना खोल दरीमध्ये त्या प्रवाहाचीही विवरे तयार होत आहेत. हे सारे निसर्गदृश्य रम्य आहे.

रामी रमलेले समर्थ रामदास निर्भयपणे सज्जनगड, सातारा, शिवथरघळ, मावळमुलुखात भ्रमंती करीत होते आणि देशकाल परिस्थितीच्या यथार्थ शब्दचित्रासह आनंदवन भुवनाचे स्वप्न पाहत होते, उत्सवी संघटन करत होते, आत्मबोधात रमत होते, तरीही पर्वत, नद्या, जंगलातून फिरणे आणि जे जे अनुभवावे ते ते सहजोद्गार व्हावे म्हणजेच शब्दसृष्टीचे ईश्वर असलेले कवी रामदास प्रत्यक्ष सृष्टिसौंदर्याचेही उपासक होते असे म्हणता येईल. एक मात्र खरे की, 'राम रंगी रंगले' असे समर्थ अन् त्यांची ही निखळ निसर्गचित्रणात्मक रचना हे दोन सत्य आणि तितकेच सत्यप्रतित अनुभव वाटतात.

### पृथ्वीपासून जाली झाडें – समर्थ रामदास

सर्वसामान्यपणे संतप्रवृत्ती मोक्षधर्माचा विचार करणारी असते. त्याच न्यायाने समर्थांच्या दासबोधाचा आत्मादेखील मोक्ष हाच आहे. दासबोधातून विविध विषयांची मांडणी करताना तत्त्वज्ञानाचा परिचय करून देतानाही समर्थांची भाषा 'प्रसाद' या काव्यगुणाचा प्रत्यय देणारी झालेली आहे. अर्थात विकारवश अशा सामान्य माणसाला तत्त्वज्ञान पचनी पडणे कठीण असल्याची जाणीव 'सावध' समर्थांना असल्यामुळे त्याला मोक्षमार्गाकडे घेऊन जाण्यापूर्वी 'प्रपंच करावा नेटका' हे सांगायला ते विसरले नाहीत. मात्र त्याचा हा जीव (न) प्रवास पंचामहाभूतांपैकी ज्या एका पृथ्वीतत्त्वावर होतो त्या पृथ्वीचे स्वरूप स्पष्ट करतानाच 'उत्पत्ती स्थिती-लय' या अवस्थेतून जिवाला कळत-नकळत




ISBN : 978-81-952462-3-6

शिवाकडे घेऊन जाणारी 'पृथ्वीपासून जालीं झाडें' ही रचना काव्यमयतेपेक्षा या रचनेतील विचारसौंदर्य अधिक महत्त्वाचे आहे.

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांपासूनच ही सृष्टी बनलेली आहे. ज्या पृथ्वीवर आपण राहतो त्या पृथ्वीच्या पोटात असलेल्या, पृथ्वीच्या वर येणाऱ्या व पृथ्वीवर राहणाऱ्या अशा या तिन्ही वस्तूंचे अनित्यत्व किंबहुना मिथ्यत्व दर्शविताना समर्थ सांगतात :

पृथ्वीपासून जाली झाडें । झाडांपासून होती लांकडें ।<br>
लांकडें भस्मोन पुढे । पृथ्वीच होये ॥ १ ॥<br>
पृथ्वीपासून वेल होती । नाना जिनस फापावती ।<br>
वाळोन कुजोन मागुती । पृथ्वीच होये ॥२॥<br>
नाना धान्यांची नाना अन्नें । मनुष्यें करिती भोजनें ।<br>
नाना विष्ठा नाना वमनें । पृथ्वीच होये ॥३॥<br>
नाना पक्षादिकीं भक्षिलें । तरीं पुढें तैसेंचि जालें ।<br>
वाळोन भस्म होऊन गेलें । पुन्हा पृथ्वी ॥४॥<br>
नाना तृण पदार्थ कुजती । पुढें त्याची होये माती ।<br>
नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी ॥५॥<br>
पदार्थ दाटले अपार । किती सांगावा विस्तार ।<br>
पृथ्वीवांचून थार । कोणास आहे ॥६॥<br>
झाड पाले आणि तृण । पशु भक्षितां होते सेण ।<br>
खात मूत भस्म मिळोन । पुन्हा पृथ्वी ॥७॥<br>
उत्पत्ति स्थिती संव्हारतें । तें तें पृथ्वीस मिळोन जाते ।<br>
जितुके होतें आणि जातें । पुन्हा पृथ्वी ॥८॥<br>
तितुकयास पृथ्वीचा आधार ।



Scanned with CamScanner

 ISBN : 978-81-952462-3-6

होती जाती प्राणिमात्र । सेवट पृथ्वी ।।९।।

हे किती म्हणौन सांगावे ।

विवेकें अवघेचि जाणावें ।

खांजणीभाजणीचें समजावें । मूळ तैसें ॥१०॥

सामान्य माणसाचे जीवन–कोडे सोडविण्याचे मोठे काम समर्थांच्या या रचनेने विविध उदाहरणांद्वारे समर्थपणे केले आहे. नुसता उपदेश बरेचदा माणसाला निष्क्रिय बनवतो. म्हणूनच समर्थ प्रत्यक्ष उपदेशापेक्षा उदाहरणाद्वारे तत्त्वज्ञान समजावून सांगण्यावर विशेष भर देतात. वृक्ष पृथ्वीच्या पोटातून वर येतो, तो वाळला की लाकूड तयार होते. लाकूड जळले की भस्म होऊन ते पुन्हा पृथ्वीरूप होते. याप्रमाणेच वेली, पत्यादिकांचे अन्न, तृण, किडे, जीवमात्र, आदी साऱ्याच गोष्टी शेवटी मातीतच मिळतात. माणूसही या गोष्टीला अपवाद नाही. एकूण उदात्ती स्थिती–लय या जीवनाच्या तीन अवस्थांमधून प्रत्येकाला जावे लागते. थोडक्यात, खांजणी भाजणीचे हे तत्त्व म्हणजे मोडणे व जोडणे ही प्रक्रिया आपण विवेकाने समजून घेतली की, समर्थांनी जिवाच्या अशाश्वततेचे सांगितलेले मर्म आपल्या लक्षात येते. त्यानंतरच अशाश्वततेकडून शाश्वताकडे जाणे म्हणजेच जिवाचा शिवाकडे होणारा प्रवास हीच समर्थांना अपेक्षित असलेली आत्मोन्नती होय. वरील रचनेतून समर्थांनी अप्रत्यक्षपणे पर्यावरणाचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. पाच संतकवी – डॉ. शं. गो. तुळपुळे, प्रथम आवृत्ती.

२. दासबोध चिंतनिका – डॉ. श्री. द. देशमुख, प्रथम आवृत्ती.



Scanned with CamScanner